# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 14.03.2026 वार- शनिवार

---

**परिषद**

संसाधन व्यवस्थापनाचं महत्त्व वाढलं असल्याचं प्रतिपादन संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे केंद्रीय संचालक डॉ. बालकृष्ण पशुपती यांनी केलं आहे. पुण्यातील रोटरी डिस्ट्रिक्ट 3131 तर्फे आयोजित पर्यावरणविषयक चक्रिय अर्थव्यवस्थेवर दोन दिवसांच्या परिषदेत दूरस्थ पद्धतीनं आज संबोधित करताना ते बोलत होते. डॉक्टर पशुपती म्हणाले की, नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापरा आणि फेकून द्या असा अतिरेक झाल्यामुळं, नैसर्गिक संसाधनं वेगानं नष्ट होत आहेत. या पार्श्वभूमीवर चक्रीय अर्थव्यवस्था ही संकल्पना अधिक महत्त्वाची ठरत असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**काळे**

भारतानं चंद्र आणि मंगळापर्यंत मजल मारली असून आता 'स्वदेशी तंत्रज्ञान' अधिक बळकट करून जागतिक स्तरावर नेतृत्व करण्याची वेळ आली असल्याचं मत ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ डॉक्टर प्रमोद काळे यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात डॉक्टर काळे यांचा सत्कार आणि एका विशेष चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. ज्या वैज्ञानिकांनी आणि सहकाऱ्यांनी माझ्यासोबत भारताच्या सुरुवातीच्या अवकाश मोहिमांमध्ये योगदान दिलं, त्या सर्वांचा हा सन्मान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

**अंगणवाडी**

गॅस सिलिंडर तुटवड्याचा परिणाम राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन एकात्मिक बाल विकास सेवा आयुक्तालयानं पर्यायी नियोजन सुरू केलं आहे. राज्यात १ लाख १० हजार 631 अंगणवाडी केंद्रे कार्यरत असून, या केंद्रांमधून दररोज ६६ लाख ५९ हजार 650 बालकांना पोषण आहार दिला जातो. यापैकी ६५ ते ७० टक्के ठिकाणी स्वयंपाकासाठी गॅसचा वापर केला जातो. पुणे जिल्ह्यातील परिस्थिती सध्या नियंत्रणात असल्याचं पुणे महिला आणि बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद खंडागळे यांनी सांगितलं.

**पाय**

आंतरराष्ट्रीय पाय दिवसानिमित्त रमणबाग प्रशालेमध्ये विविध गणित उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. वाईच्या द्रविड हायस्कूल निवृत्त मुख्याध्यापक आणि गणित शिक्षक नागेश मोने यांनी घेतलेल्या गणित शिक्षकांच्या कार्यशाळेमध्ये त्यांनी तयार केलेल्या पाय दिन विशेष कार्यपत्रिकेबद्दल मार्गदर्शन केलं. गणित शिक्षकांनी या मार्गदर्शनानुसार सर्व वर्गांमध्ये या कृती करून घेतल्या. प्रशालेच्या फरसबंद चौकात पायच्या आकारात मानवी आकृती साकारण्यात आली होती.

**पुरस्कार**

माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठी नाटकांवर करमणूक कर आकारला जाणार नाही, असा निर्णय घेतला होता. त्यांच्या या दूरदर्शी निर्णयाचे फायदे आजतागायत मराठी नाट्यसृष्टीला मिळत असल्याची भावना ज्येष्ठ नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते सतीश आळेकर यांनी आज पुण्यात चाळीसावं कवी संमेलन आणि यशवंतराव चव्हाण कला साहित्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात व्यक्त केली. या समारंभात ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते महेश कोठारे यांना 'यशवंतराव चव्हाण कला जीवनगौरव पुरस्कार', तर रानमाणूस प्रसाद गावडे यांना 'अजितदादा सामाजिक कार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

**गॅस**

युद्धामुळं निर्माण झालेल्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात गॅस सिलिंडरची साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध जिल्हा प्रशासनानं कडक पावलं उचलली आहेत. अन्न पुरवठा विभागानं कासारवाडी इथल्या एका गॅस एजन्सीवर टाकलेल्या छाप्यात एका गोदामात अवैधपणे साठा केलेले ५४ भरलेले आणि २०७ रिकामे सिलिंडर जप्त करण्यात आले.

**सायबर**

डिजिटल साधनांचा वापर करताना सायबर सुरक्षिततेबाबत सर्वांनी दक्षता बाळगणं आवश्यक आहे असं मत सायबर तज्ञ डॉक्टर रोहन न्यायाधीश यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत व्यवसाय व्यवस्थापन आणि संशोधन संस्थेद्वारे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. समाजमाध्यमांचा वापर करताना कोणत्याही प्रकारची वैयक्तिक माहिती देऊ नये, मोबाईलमध्ये गरजेपुरत्या ऍप्सचाच वापर करावा असंही न्यायाधीश यांनी सांगितले. या कार्यक्रमाला व्यवस्थापनशास्त्र संस्थांचे विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग सहभागी झाले होते.

**फूट**

पाचशे चौरस फूटापर्यंतच्या घरांना मिळकत कर माफी देणं सध्या शक्य नसल्याचं मत पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केलं आहे. महापालिकेच्या नोंदीनुसार सुमारे ४ लाख ४३ हजार मिळकती असून त्यातून वार्षिक २६८ कोटी रुपयांची कराची मागणी होते. अनेक जुन्या मिळकतींचे ‘अ’ फॉर्म संगणकीकृत नसल्यानं अचूक आकडेवारीसाठी नव्यानं सर्वेक्षण आवश्यक आहे. बहुमजली इमारतींमध्ये लहान सदनिका मोठ्या प्रमाणात असल्यानं करमाफी दिल्यास मोठ्या प्रमाणात महसुलात घट होण्याची शक्यता आहे. तसंच लहान घरांची मागणी वाढल्यास शहरातील पायाभूत सुविधांवर अतिरिक्त ताण येऊ शकतो, असेही आयुक्तांनी स्पष्ट केलं.

**ई-लर्निंग**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील शिक्षण अधिक दर्जेदार आणि स्पर्धात्मक करण्यासाठी प्रशासनानं येत्या शैक्षणिक वर्षापासून 10 ई-लर्निंग शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित 8 नवीन शाळाही सुरू करण्यात येणार आहेत अशी माहिती अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी दिली.

**कुस्ती**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेच्यावतीनं 68 वी महाराष्ट्र केसरी स्पर्धा १८ ते 22 मार्च दरम्यान वाघोली इथल्या अजित दादा पवार क्रीडा नगरीत होणार आहे. 42 जिल्हा कुस्ती संघांमधून अंदाजे दीड हजार कुस्तीपटू स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**